**Golden Research Thoughts**
**Vol -2 , ISSUE –11, May.2013**
**ISSN:- 2231-5063**
Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

GRT

# आशययुक्त अध्यापन पध्दतीचा छात्र अध्यापकांचा आशय आणि अध्यापन पध्दतीचे एकात्मीकरणावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

**एस. जे. अहिरे**
श्री. सु. हि. नाईक शिक्षणशास्त्र
महाविद्यालय, नवापूर ता. नवापूर जि. नंदुरबार

**सारांश :-**

विद्यार्थी शिक्षक शालेय स्तरावर शिकविल्या जाणाऱ्या विषयांचे त्याला सखोल ज्ञान असावे. या ज्ञानातील शालेय स्तरावरील विषयांचे बारकावे (आशयज्ञान) माहित असावेत. विद्यार्थ्याला ज्ञानात्मक, बोधात्मक व क्रियात्मक या तिन्ही क्षेत्राची जाणीव असावी. शालेय स्तरावर असलेला ज्ञानाची पार्श्वभूमी व उत्तरार्थ या सर्व गोष्टीचे संस्कार विद्यार्थी शिक्षकावर व्हायला हवेत शिक्षण प्रशिक्षणात अध्यापन कौशल्ये व अध्यापन क्षमता आत्मसात करीत असतात परंतु विषयज्ञान पदवी पर्यतच्या शिक्षणात त्यांनी प्राप्त केलेले असते असे गृहीत धरले जाते. शिक्षक प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षण देतांना शालेय विषय पदवी आणि पदव्युत्तर पातळीवर अभ्यासलेला असतो त्याचा परिणाम त्याच्या अध्यापनावर होतो. पदवी आणि पदव्युत्तर पातळीवर माहिती असलेल्या घटना, प्रसंग, विविध आशय ह्यांचे अध्यापन करतांना विविध पध्दतीचा व तंत्रांचा विचार केला तर त्याची परिणाम कारकता वाढते. नुसता आशय माहिती असून चालत नाही तर आशयाचे अध्यापन करतांना विविध पध्दतींचा वापर कसा करावा आशयाचे एकात्रीकरण कसे करावे हे ज्ञान प्राप्त कसे पाहिजे.

**प्रस्तावना :-**

ज्ञानाच्या कक्षा खूप वाढत चाललेला आहेत त्यात शालेय विद्यार्थ्यामध्ये मोठ्या प्रमाणात बद्दल होतांना दिसतात. त्यामुळे या विद्यार्थ्यांचा काही बदलत आहे ज्या प्रमाणे कौटुबिक, आर्थिक, सामाजिकस्थितीत बदल होतांना दिसतात. हे बदल गृहीत धरुन अशा विद्यार्थी समुहास शिकविणे या दृष्टीकोनातून शिक्षकांनीही स्वत: बदल स्किारुन त्यानुसार आपल्या अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत बदल करणे आवश्यक आहे हे बदल स्विकारत असतांना जे विद्यार्थी-शिक्षक आजचे विद्यार्थी आहेत. तेच उद्याचे यावी नागरिक घडविणारे शिक्षक होणार आहेत यादृष्टीकोनातून त्यांना संस्कारीत करणे ही शिक्षण प्रशिक्षणाची मोठी जबाबदारी आहे.

शिक्षण प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमात आशययुक्त अध्यापन पध्दतीला ६०% भारांश देण्यात आला आहे. यालाच शिक्षण प्रशिक्षणाचा आत्मा म्हणतात. यावर आधारित हा संशोधनाचा प्रयत्न आहे. विद्यार्थी शिक्षकाने इ. ५ व ते १२ पर्यतच्या पाठ्यपुस्तकातील ज्ञान संपादन करुन ते शालेय विद्यार्थ्यांच्या स्तरावर जाउुन त्यांना ते आशय समजावून देण्याची क्षमता असणे आवश्यक आहे. परंतू पदवी व पदव्युत्तर झालेला विद्यार्थ्यांमध्ये हे ज्ञान फारच कमी प्रमाणात दिसून येते. शालेय स्तरावर शिकविला जाणाऱ्या सर्वच विषयाचे ज्ञान पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना प्राप्त झालेले असतेच असे नाही.

एखादा विद्यार्थी पदवीधर झाला म्हणजे त्याची विषयाज्ञानाची व्याप्ती व खोली त्याला प्राप्त झालेली असतेच असे नाही.

पदवी परीक्षेसाठी एखाद्याने प्राप्त केलेले विद्याशाखेचे ज्ञान व त्याच विषयाचे शालेय स्तरावर समाविष्ट केलेले ज्ञान ह्यात खूपच तफावत असणे किंबहुना जे शालेय स्तरावर शिकविले जाते त्याची चर्चा पदवीस्तरावर होतेच असे नाही अशी आशय संपादनाची स्थिती विद्यार्थी शिक्षकांची असते.

विद्यार्थी शिक्षकास शालेय स्तरावर शिकविलेला जाणाऱ्या विषयाचे सखोल असावे. या ज्ञानातील बारकावे (आशयज्ञानाच्या स्वरुपासह ज्ञानाच्या बोधात्मक, भावालक व क्रियालक क्षेत्राची नाण, शालेय स्तरावर असलेल्या ज्ञानाची (आशय) पार्श्वभूमी (पूर्वमाहिती) व उत्तरार्ध या सर्व गोष्टीचे संस्कार विद्यार्थी शिक्षकांवर झाले पाहिजेत. शिक्षण प्रशिक्षणात अध्यापन कौशल्ये व अध्यापन क्षमता आत्मसात करीत असतात परंतु विषयज्ञान पदवी पर्यंतच्या शिक्षणात त्यांनी प्राप्त केलेले असते असे गृहीत धरले जाते.

शिक्षक प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षण देतांना शालेय विषय पदवी आणि पदव्युत्तर पातळीवर अभ्यासलेला असतो. त्याचा परिणाम त्यांच्या अध्यापनावर होतो. संबंधित घटकांचे अध्यापन करतांना तो दिसतो पदवी आणि पदव्युत्तर पातळीवर माहिती असलेल्या घटना प्रसंग विविध आशय ह्यांचे अध्यापन करतांना विविध पध्दतींचा व तंत्राचा वापर केला तर त्याची परिणाम कारकता वाढते नुसता आशय माहित असून चालत नाहीतर आशयाचे अध्यापन करतांना विविध पध्दतींचा वापर कसा करावा. आशयाचे एकात्मीकरण कसे करावे याचे ज्ञान आवश्यक आहे.

**उद्दिष्टे :-**

१) आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या छात्रअध्यापकांच्या आशय आणि अध्यापन पध्दतीचे एकात्मीकरणावर होणारा परिणाम अभ्यासणे.

२) आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या छात्रअध्यापकांच्या आशय आणि अध्यापन पध्दतीचे एकात्मीकरणाच्या धारणेवर होणारा परिणाम अभ्यासणे.

**चले :-**

**स्वाश्रयीचल :-**

पदवी प्रायोगिक व पदवी नियंत्रित या पातळीवर आशययुक्त अध्यापन

**आश्रयीचल :-**

अध्यापनातून अभिव्यक्त होणाऱ्या आशयज्ञान समृध्दीची धारणा

**परिकल्पना :-**

१) आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या छात्र अध्यापकांच्या आशय आणि अध्यापन पध्दतीचे एकात्मीकरणावर कोणताही परिणाम होत नाही.

२) आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या छात्र अध्यापकांच्या आशय आणि अध्यापन पध्दतीच्या एकात्मीकरणाच्या धारणेवर कोणताही परिणाम होत नाही.

**संशोधन पध्दती व अभिकल्प :-**

प्रायोगिक संशोधन पध्दतीतील केवळ उत्तर परीक्षण नियंत्रित गट अभिकल्प.

**न्यादर्श :-**

पदवी नियंत्रित व पदवी प्रायोगिक गटातील मराठी, इतिहास, गणित व सायन्स या शालेय विषयातील नियंत्रित ३१ व प्रायेगिक गटातील ३१ छात्रअध्यापकांची यादृच्छिक निवड पध्दतीने निवड करण्यात आली एकूण ६२ विद्यार्थी होते.

**संशोधन साधने :-**

आशय व अध्यापन पध्दती एकात्मीकरण अ श्रेणी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात विकासीत केलेली अ आशय अध्यापन एकात्मीकरण श्रेणी चाचणी मध्ये एकूण ३० प्रश्न होय, नाही, अंशय अशा स्वरुपाची निरिक्षण श्रेणी.

**संशोधन कार्यपध्दती :-**

प्रथम न्यादर्शाचे यादृच्छिक पध्दतीने प्रायोगिक व नियंत्रित यानुसार दोन गट केले या दोन्ही गटांतील प्रायोगिक पदवी गटाला प्रायोगिक पध्दतीने आशययुक्त अध्यापन पध्दतीचे प्रशिक्षण देण्यात आले प्रयोग पूर्व एक चाचणी देण्यात आली नंतर ४८ तासाचे आशययुक्त अध्यापन पध्दतीचे प्रशिक्षण देऊन

त्यांना १ महिन्यानंतर आशय आणि अध्यापन एकात्मीकरणाची श्रेणी भरुन घेण्यात आली. नियंत्रित गटाला यापासून पूर्ण पणे अलिप्त ठेवून त्यांच्याकडूनही प्रयोग पूर्व व १ महिन्यानंतर आशय आणि अध्यापन पध्दतीचे एकात्मिकरण श्रेणी भरुन घेण्यात आली.

**व्याख्यान :-**

१) आशय अध्यपन पध्दतीची संकल्पना, स्वरुप व आशय विश्लेषण संकल्पना, स्वरुप, महत्त्व, अध्यापन घटकाचे प्रत्यक्ष आशय विश्लेषण.

२) अध्यापन पूर्व आशयज्ञान अभिवृध्दी संकल्पना, स्वरुप व महत्त्व कृती-विषय संरचना, संरचनेतील घटकांचे स्थान, आशयनकाशा अभ्यासक्रमातील घटकांचे स्थान, महत्त्व व भारांश आवश्यक संदर्भ निश्चिती.

३) अध्यापन आशयाचा इतर घटकांशी संबंध त्या घटकांचा त्याच विषयातील वरच्या व खालच्या इयत्तांशी संबंध, त्या घटकांचा त्याच पुस्तकातील इतर घटकांशी संबंध, त्याच घटकाचा त्याच इयत्तेच्या इतर विषयांशी संबंध नियंत्रित गटाचे पारंपारिक पध्दतीचे कार्य चालू होते.

४)

**माहिती संकलनाचे सांख्यिकीय तंत्रानुसार विश्लेषण**

**उद्दिष्ट १ :-**

**आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या छात्रअध्यापकांच्या आशय आणि अध्यापन पध्दतीचे एकात्मीकरणावर होणारा परिणाम अभ्यासणे.**

**सारणी क्र. १**

नियंत्रित पदवी व प्रायोगिक पदवी गटाच्या उत्तर आशय आणि अध्यापन पध्दतीचे एकात्मीकरण निरिक्षण श्रेणीची तुलना.

| अभ्यास गट | आशय आणि अध्यापन एकात्मीकरण श्रेणी | संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन | मध्यमानातील फरक | t-मूल्य | प्राप्त t ची सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नियंत्रित पदवी गट | उत्तर चाचणी | ३१ | १३.५८ | ४.६३ | २३.८८ | २१.४४ | उच्च सार्थक |
| प्रायोगिक पदवी गट | उत्तर चाचणी | ३१ | ३६.९६ | ४.०१ | | | |

स्वाधीनता मात्रा (df)=६० करिता लक्षणीय पातळी मूल्य = ०.०५ स्तरावर २.०० आहे.

स्वाधीनता मात्रा (df)=६० करिता लक्षणीय पातळी मूल्य = ०.०१ स्तरावर २.६६ आहे.

**उद्दिष्ट २ :-**

**आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या छात्रअध्यापकांच्या आशय आणि अध्यापन पध्दतीचे एकात्मीकरणाच्या धारणेवर होणारा परिणाम अभ्यासणे.**

**Golden Research Thoughts**
**Vol -2 , ISSUE –11, May.2013**
**ISSN:- 2231-5063** Available online at www.aygrt.net

**सारणी क्र. २**

नियंत्रित पदवी व प्रायोगिक गटाच्या धारणा आशय आणि अध्यापन पध्दतीचे एकात्मीकरण निरीक्षण श्रेणीची तुलना.

| अभ्यास गट | आशय आणि अध्यापन एकात्मीकरण श्रेणी | संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन | मध्यमानातील फरक | t-मूल्य | प्राप्त t ची सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नियंत्रित पदवीगट | उत्तर चाचणी | ३१ | १३.५८ | ४.६३ | १.३८ | १.०६ | असार्थक |
| | धारणा चाचणी | ३१ | १४.९६ | ५.५८ | | | |
| प्रायोगिक पदवीगट | उत्तर चाचणी | ३१ | ३६.९६ | ४.०१ | ०.०७ | ०.०५ | असार्थक |
| | धारणा चाचणी | ३१ | ३७.०३ | ५.५३ | | | |

स्वाधीनता मात्रा (df)=६० करिता लक्षणीय पातळी मूल्य = ०.०५ स्तरावर २.०० आहे.

स्वाधीनता मात्रा (df)=६० करिता लक्षणीय पातळी मूल्य = ०.०१ स्तरावर २.६६ आहे.

**निष्कर्ष :-**

१) आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या आशय आणि अध्यापन पध्दतीच्या एकात्मीकरणावर लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते. म्हणजेच पारंपारिक पध्दतीपेक्षा आशययुक्त अध्यापन पध्दतीचे प्रशिक्षण एकात्मीकरणा संदर्भात अधिक परिणामकारक आहे.

२) पारंपारिक प्रशिक्षण पध्दती आशययुक्त अध्यापन पध्दती गटातील छात्र अध्यापकांच्या आशय आणि अध्यापन पध्दतीचे एकात्मीकरणाच्या धारणेत कोणत्याही प्रकारचा फरक दिसून येत नाही ह्याचाच अर्थ तो टिकून राहतो.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) जोशी, अ. न. (१९९९) आशययुक्त अध्यापन पध्दती. नाशिकः य. च. म. मुक्त विद्यापीठ.

२) साळुंके, क. (२००४) आशययुक्त अध्यापन पध्दती कार्यपुस्तिकाभाग क्र. १ नाशिकः य. च. म. मुक्त विद्यापीठ.

३) कर्डिले, व. आणि महाले, सं. रा. (२००५). *'संशोधनात सांख्यिकी तंत्राचे उपयोजन'.* नाशिकः य. च. म. मुक्त विद्यापीठ.